नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८३/२०१३
नि. ४५ लगत

<u>शपथेवर सुरू</u>

पुढील सरतपास वादीतर्फे <u>वकील श्री. एम.आय. सययद यांचेमार्फत</u>

११ मी दाव्यासोबत व आज रोजी दाखल केलेले कागदपत्र मला दाखवले. वादी क्र. २ हिने हा दावा चालवण्याचा व यात पुरावा देण्याचे मला कुलअखत्यारपत्र करून दिलेले आहे. ते मला दाखवले. त्यावर माझी व वादी क्र. २ हिची सही, अंगठा असून त्यावर नोटरी ॲड. अजित राणे यांची सहि व शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ६५</u>** दिली आहे. मला आता दिनांक १९/०५/१९९३ रोजीचे प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांची आई राधाबाई हिने माझ्या पत्नीला स.क्र. १३२ हि.क्र. ५ पैकी ०.६.० क्षेत्राचे करून दिलेले खरेदीखत दाखवले. ते तेच आहे. त्यास **<u>नि. ६६</u>** दिली आहे. माझी पत्नी वादी क्र. २ हिने उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांना दिनांक १४/१/२००० रोजी दिलेल्या अर्जाची स्थळप्रत मला दाखवली ती तीच आहे. त्यावर वादी क्र. २ हिची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ६७</u>** दिली आहे. प्रतिवादी क्र. ३ च्या लग्नाची पत्रिका मी हजर केली आहे. ती मला दाखवली ती तीच आहे. त्यास **<u>नि. ६८</u>** दिली आहे. वादी क्र. २ हिने वनश्री फार्म येथून खरेदी केलेल्या नारळांची रोपांच्या बिलाची पावती हजर केली आहे. त्यास **<u>नि. ६९</u>** दिली आहे. दिनांक ०३/४/२००१ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी यांनी माझ्या पत्नीला स.क्र. १३३ हि. क्र.९ च्या हदद ठराव मोजणीसाठी हजर रहाण्याकरीता दिलेली नोटीस मी दाखल केली आहे. त्यावर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी यांची सहि आहे. त्यास **<u>नि. ७०</u>** दिली आहे. माझ्या पत्नीने तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी यांचेकडे दिनांक २/७/२००१ रोजी केलेल्या अर्जाची स्थळप्रत मला दाखवली. त्यावर माझ्या पत्नीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ७१</u>** दिली आहे. माझी पत्नी हिने दिनांक १६/५/२००१ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी यांना दिलेल्या अर्जाची स्थळप्रत मी दाखल केली आहे. त्यावर माझ्या पत्नीची सहि आहे. त्यातील मजकूर बरोबर हो त्यास **<u>नि ७२</u>** दिली आहे. मी हदद ठराव मोजणी क्र. <u>६८२/२००१</u> च्या नकाशाचा खरा उतारा दाखल केला आहे. त्यावर मुख्यालय सहाय्यक तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी यांची सही व शिक्का आहे. त्यास **<u>नि. ७३</u>** दिली आहे. उपविभागीय अधिकारी महसुल, सावंतवाडी यांच्याकडील मेळाची फाईलची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यावर उपविभागीय अधिकारी महसुल, सावंतवाडी यांची सही व शिक्का आहे. ती प्रमाणित प्रत असल्याने त्यास **<u>नि. ७४</u>** दिली आहे. माझ्या पत्नीने प्रतिवादी यांच्याविरूध्द दाखल केलेल्या कॅव्हेट अर्जाची स्थळप्रत मला दाखवली. त्यावर माझे वकील श्री. सय्यद यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ७५</u>** दिली आहे. दिनांक १६/८/१९९९ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या आईला आमचे वकील श्री. एम्.आय. सय्यद यांचेमार्फत नोटीस पाठवली होती. त्या नोटीस कार्यालयीन प्रत मी दाखल केलेली आहे. त्यावर माझे वकील श्री. एम.आय. सय्यद यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ७६</u>** दिली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ विरूध्द दिनांक २९/११/२०१२ रोजी दाखल केलेल्या कॅव्हेट अर्जाची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर आमचे विधिज्ञ श्री. सय्यद यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.७७</u>** दिली आहे. प्रतिवादी क्र. १ यांना पाठविलेल्या रजि. पोष्ट ए.डी.चा परत आलेला लखोटा, प्रतिवादी क्र. २ यांना पाठवलेल्या रजि. पोष्ट ए.डीचा परत आलेला लखोटा हजर केला आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि. ७८ व ७९</u>** दिली आहे. प्रतिवादी यांनी दिनांक २३/८/२०१२ रोजीच्या दैनिक 'तरूण भारत' या वृत्तपत्रात दिलेल्या जाहिर नोटीसीस **<u>नि. ८०</u>** दिली आहे. त्या जाहिर नोटीसला आम्ही दिनांक २५/८/२०१२ रोजीच्या दैनिक 'तरूण भारत' या

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८३/२०१३
नि. ४५ लगत

वृत्तपत्रात जहिर उत्तर दिले होते. त्यास **<u>नि. ८१</u>** दिली आहे. आमच्या वकीलांमार्फत प्रतिवादी यांना जाहिर नोटीसीस उत्तर रजि. पोष्ट ए.डी.ने दिनांक २७/८/२०१२ रोजी पाठवले होते. त्याची कार्यालयीन प्रत मी दाखल केली आहे. त्यावर माझे वकील ॲड जे.एम्.सय्यद यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ८२</u>** दिली आहे. ती नोटीस प्रतिवादी क्र. १ हिस मिळाल्याबाबतची पोष्टाची पावती दाखल केली आहे. त्यावर प्रतिवादी क्र. १ चे पती यांची सही आहे. त्यास **<u>नि. ८३</u>** दिली आहे. प्रतिवादी क्र. २ हिस जाहिर नोटीस उत्तर पाठवल्याचा पोष्टाचा परत आलेला लखोटा दाखल केला आहे. त्यास **<u>नि. ८४</u>** दिली आहे. प्रतिवादी क्र. ३ हिला जाहिर नोटीस उत्तर रजि. पोष्ट ए.डीने पाठवले होते. त्याची पोष्टाची पोहोच पावती दाखल केली आहे. त्यावर प्रतिवादी क्र. ३ ची सही व पोष्टाचा शिक्का आहे. त्यास **<u>नि. ८५</u>** दिली आहे. दिनांक २७/८/२०१२ रोजी आमचे वकील श्री. जावेद सय्यद यांचेमार्फत ॲड. रामनाथ बावकर यांना उत्तर पाठवले होते. त्याची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.८६</u>** दिली आहे. ती नोटीस ॲड. रामनाथ बावकर यांना पोहोच झाल्याबाबत पोष्टाची पोहोच पावती दाखल केली आहे. त्यावर ॲड. रामनाथ बाावकर यांची सही व पोष्टाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ८७</u>** दिली आहे. आम्ही ॲड श्री. जावेद सय्यद यांचेमार्फत प्रतिवादी यांना दिनांक २८/१/२०१३ रोजी नोटीस पाठवली होती. त्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर आमचे वकील श्री. जावेद सय्यद याची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ८८</u>** दिली आहे. त्या नोटीसचा प्रतिवादी क्र. १ हिस पाठवलेला लखोटा पोष्टाच्या शिक्कयाने परत आलेला आहे. तो मला दाखवला. तो तोच आहे. त्यास **<u>नि. ८९</u>** दिली आहे. त्या नोटीसचा प्रतिवादी क्र. २ हिस पाठवलेला लखोटा पोष्टाच्या शिक्कयाने परत आलेला आहे. तो मला दाखवला तो तोच आहे. त्यास **<u>नि. ९०</u>** दिली आहे. त्या नोटीसची प्रतिवादी क्र. ३ हिस पोहोच झाल्याची पोष्टाची पोहोच पावती दाखल केली आहे. ती तीच आहे. त्यावर प्रतिवादी क्र. ३ ची सही व पोष्टाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि. ९१</u>** दिली आहे. दिनांक २८/१/२००० रोजी आम्ही आमचे वकील श्री.एम्.आय्. सय्यद यांच्यामार्फत दैनिक 'कोंकणसाद' मध्ये दिलेली जाहिर नोटीस दाखल केली आहे. ती तीच आहे. त्यास **<u>नि. ९२</u>** दिली आहे.

<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. एस्.जे. बावंकर यांचेतर्फे</u>
<u>प्रतिवादीच्या विधिज्ञांनी तोंडी उलटतपास घेण्यास मुदत मागितली. सबब मुदत दिली</u>.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/—
(एम्.एस्.बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) ,
सावंतवाडी.

दिनांक :— ०३/०८/२०१७.